# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक १४१ / २०२४**

**वीज जोडणीची तारीख वीज देयकावर मिळण्याबाबत**

बाळकृष्ण महादेव सरदार ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड (ए.ई.एम.एल.) ........................................................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :-

गैरहजर

प्रतिवादीतर्फे :-

१. मुत्यृंजय झा. महाव्यवस्थापक, नोडल अधिकारी
२. अपेक्षा जाधव, व्यवस्थापक

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २८ नोव्हेंबर २०२४

आदेश पारित दिनांक :- ११ डिसेंबर २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम 2020 (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

मंच, अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड (मंच) यांच्याकडील तक्रार (क्रमांक सीजीआरएफ०५००३/२०२४-२५) दिनांक २७ ऑगष्ट २०२४ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढण्यात आली. सदर आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी दाखल केले.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

1) अपिलार्थी बाळकृष्ण महादेव सरदार हे खोली क्र.९७३, गजानन सहकारी गृहनिर्माण सोसायटी, गणेश चाळ, सिटी सर्व्हे न. ७२, शांतीनगर, दत्त मंदिराजवळ, साईनाथ नगर रोड, गोळीबार रोड घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ येथील २०११ पुर्वी पासून (वीज देयकात नमुद केल्यानुसार) घरगुती वीज ग्राहक (क्र.१०१८४४८३३)आहेत.

2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहीता आणि वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनिमय २०२१ (विद्युत पुरवठा संहीता व पॉवर क्वॉलीटी विनिमय २०२१) मधील विनियम १६.२.४.(अ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

*"१६.२.४. देयकामध्ये इतर बाबींबरोबरच खालील माहिती सुवाच्य स्वरुपात असेल*
*(अ) ग्राहक क्रमांक, नाव आणि पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी आणि जोडणीचा दिनांक"*

वरील तरतुदीनसार देण्यात येणाऱ्या वीज देयकावर अपिलार्थीच्या मुळ खोली मालकाला वीज जोडणी दिल्याची तारीख नमुद करून देण्यात यावी म्हणून अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कंपनीकडे दिनांक ६ मे २०२४ रोजी अर्ज केला. तथापि प्रतिवादीने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

3) अपिलार्थीने त्यांना त्यांच्या वीज जोडणीची तारीखची नोंद वीज देयकावर न झाल्याने दिनांक २७ मे २०२४ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने वीज देयकावर जोडणी दिनांक Prior to August 2011 (सदर वितरण कंपनीचा ताबा अदाणी इलेक्ट्रीसीटी मुबंई लिमिटेडकडे आल्यापासून) अशी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

अपिलार्थींच्या वीज देयकावर नोंद असल्याने अपिलार्थींची तक्रार दिनांक २७ ऑगष्ट २०२४ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढली.

4) **सदर वीज देयकावरील तारखेचा उल्लेख असल्यास सदर जागी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण SRA मार्फत भविष्यात पुर्नविकास झाल्यास त्यांना नवीन रूम मिळण्यास फायदा राहील वा सदर रूम ची खरेदी विक्रीस मदत होईल.**

5) अपिलार्थीने विनंती केली की **वीज देयकावर वीज जोडणी दिल्याची तारीख देण्यात यावी.**

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे. *(टिप्पणी : प्रतिवादी यांचे उत्तर इंग्रजीमध्ये आहे).*

1) अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड कंपनीने मुंबई उपनगर मधील काही विभागात वीज वितरणाची काम करणारी रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लिमीटेड कंपनी २०११ साली विकत घेतली. तेव्हापासून अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड कंपनी त्या विभागात वीज वितरणाचे काम करत आहे.

2) अपिलार्थी अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेडचे २०११ पुर्वी पासून (वीज देयकात नमुद केल्यानुसार) घरगुती वीज ग्राहक (क्र.१०१८४४८३३) आहेत (त्यापुर्वी ते रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लिमीटेड कंपनीचे ग्राहक होते). **रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लिमीटेड कंपनीचा वीज जोडणी दिलेल्या तारखांचा मुळ डाटा उपलब्ध नसल्याने त्यापुर्वीच्या वीज देयकांवर "२०११ पुर्वी पासूनचे ग्राहक" असल्याचे नोंद करण्यात आलेली आहे.** त्यानुसार अपिलार्थींच्या वीज देयकावर सुध्दा २०११ पुर्वी पासूनचे ग्राहक अशी नोंद आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेडचा पुर्वीचा मुळ रेकॉर्ड शोधून संबधीत तपशील शोधने अत्यंत अवघड व जिकरीचे आहे.

3) विद्युत पुरवठा संहीता आणि कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनिमय २००५ मधील कलम १५.२.४ नुसार वीज देयकावर वीज जोडणीच्या तारखेची नोंद करण्याची कोणतीही तरतूद नव्हती.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

विद्युत पुरवठा संहीता व पॉवर क्वॉलीटी विनिमय २०२१ हे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ पासून लागू करण्यात आले. त्यातील कलम १६.२.४.(अ) च्या तरतुदीनुसार वीज देयकामध्ये इतर बाबींबरोबरच वीज जोडणीचो तारीख, अपिलार्थी जेव्हा ग्राहक झाले, तेव्हापासूनचा तपशील नमुद आहे. त्यानुसार दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ पासूनच्या वीज देयकावर वीज जोडणीच्या तारखेची नोंद करण्यात येत आहे. सदर विनियम परिच्छेद २ मध्ये नमुद केलेला आहे.

4) अपिलार्थी हे २०११ पुर्वीचे ग्राहक आहेत. ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०20 मधील विनियम २.१(इ) अन्वये गाऱ्हाणेच्या व्याख्येत बसत नाही. गाऱ्हाणेची व्याख्या खालीलप्रमाणे.

   *"'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरू शकणाऱ्या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करने किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालांच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गाऱ्हाणे, यांचा समावेश होतो."*

5) अपिलार्थीचा तक्रार अर्ज 'गाऱ्हाण' या व्याख्येत बसत नाही. म्हणून ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०20 मधील विनियम १९.२५ अन्वये स्वीकारता येऊ शकत नाही. सदर विनियम खालीलप्रमाणे.

   *"जर अभिवेदन खालीलप्रमाणे असल्याचे आढळले तर प्रकरण कोणत्याही स्तरावर असले तरी विद्युत लोकपाल ते नाकारेल –*

   *(ए) क्षल्लक, उपद्रवकारक, दुष्ट हेतूचे;*

   *(बी) पुरेसे कारण नसलेले;*

   *(सी) ग्राहकाला सकृतदर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान किंवा गैरसोय झाली नसल्यास;*

   *परंतू असे की, या बाबतीत विद्युत लोकपालाचा निर्णय अंतिम असेल व तो ग्राहक आणि वितरण परवानाधारकावर बंधनकारक राहील.*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*परंतू असे की, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही तर, वरील उपखंड (ए) (बी) व (सी) खालील कोणतेही अभिवेदन, नाकारता येणार नाही."*

6) अपिलार्थी हे २०११ पुर्वी पासूनचे ग्राहक असल्याने अपिलार्थीची वीज देयकावरील वीज जोडणीच्या दिनांकाची मागणी ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम 2020 मधील विनियम ७.८ अन्वये **कालबाह्य** आहे. सदर विनियम खालीलप्रमाणे.

*"७.८ कारवाईचे कारण उद्‌भवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

7) प्रतिवादीने माननीय मुंबई उच्च न्यायालय, सु-मोटो रिट याचीका क्र. २ / २०२३ (व इतर) दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ चा निर्णय संदर्भीत केला आहे. निर्णयात असे नमुद केले की अनधिकृत बांधकामांना वीज पुरवठा दिलेला असला तरी सुध्दा असे बांधकाम अधिकृत असल्यासाठी वीज देयक पुरावा म्हणून वापरता येत नाही.

8) प्रतिवादीने माननीय आयोगाचे दिनांक २६ डिसेंबर २०२३ चे कृती मानके विनियम २०२१ बाबतचे इंग्रजी भाषेतील प्रॅक्टीस डायरेक्शन खाली उदधृत केले आहेत ते खालीलप्रमाणे.

*"Practice Direction:*

*a. Distribution Licensee shall add following disclaimer in their Application format for the new electricity connection: "This application for power supply when processed and considered by the distribution licensee cannot be treated or utilised as proof that the premises for which the power supply is sought is an authorised structure nor would such consideration of an application by the distribution licensee amount to proof of ownership of premises."*

*b. Distribution Licensee shall add following statement in Electricity Bill: "This bill for power supply cannot be treated or utilised as proof that the premises for which the power supply has been granted is an authorised*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*structure nor would the issuance of the bill amount to proof of ownership of the premises."*

9) प्रतिवादीने नमुद केले की, त्यांच्या कामाच्या गुणवत्तेत, आणि कामाच्या स्वरूपात कोणताही दोष, अपूर्णता, कमतरता किवां अपुरेपणा नाही. तसेच, माननीय विद्युत लोकपालांकडे अशाच प्रकारचे त्याच विषयाबाबतचे अभिवेदन क्रमांक ४३ / 2023 बाबूराव खांबे विरूध्द अदाणी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड हे **वीज जोडणीची तारीख ही गाऱ्हाणेच्या व्याख्येच्या कक्षेत बसत नाही,** म्हणून फेटाळण्यात आल्याचे स्पष्ट केले.

10) अपिलार्थी बाळकृष्ण महादेव सरदार हे कधीही प्रतिवादीच्या समोर प्रत्यक्षः आले नाही. फॉर्म 'अ' व फॉर्म ब वर सही अपिलार्थीचीच आहे की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आह. तसेच, अपिलार्थी श्री. बाळकृष्ण महादेव सरदार हे मंचान विंनती करून सुध्दा वैयक्तिक रित्या सुनावणीस प्रत्यक्ष हजर नव्हते, तसेच, मा. विद्युत लोकपाल याच्यापुढील सुनावणीस सुध्दा ते गैरहजर आहेत. सदर बाबींची नोंद घेण्यात यावी.

11) प्रतिवादीने विनंती केली की, वादी प्रतिवादी यांचो कागदपत्र व संपर्ण तथ्याचा विचार करता मंचाने दिलेला आदेश कायम ठेवावा व अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

**विश्लेषण व निर्णय**

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. उपलब्ध कागदपत्रे व माहितीवरून असे दिसते की, बाळकृष्ण महादेव सरदार हे प्रतिवादीचे ऑगष्ट २०११ पुर्वीपासूनचे ग्राहक आहेत, त्याबाबतची नोंद चालू वीज देयकावर आहे. शिवाय प्रतिवादींनी अपिलार्थीना दिनांक २ ऑगष्ट २०२४ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे. *(टिप्पणी : प्रतिवादी यांचे पत्र इंग्रजीमध्ये आहे).*

*"Please note since it is a very old connection and we do not have the exact date of connection, you have produced a copy of the electricity bill for the billing month of Nov-1989 issued to you.*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*Relying upon the copy of bill submitted by you we state that date of connection on CA No is 101844833 connected to address -R No.973, Ganesh Chawl, Shanti Nagar, City survey number 72, Ganesh Nagar, Sainath Nagar Road, Ghatkopar-west, Mumbai-400 086 is existing **prior to Nov-1989**.*

*The connection is provided for residential use and the account is active."*

५. मंचाने आपल्या आदेशातील मुद्दा क्र.१७ मध्ये खालील प्रमाणे नमुद केले.

*"उपरोक्त नमुद तथ्यांच्या अनुषंगाने असे दिसून येते की, प्रतिवादीच्या पत्रातील मजकूर वीज जोडणीची तारीख प्रदान करण्याच्या बाबतीत त्यांची भुमिका स्पष्ट करणारी पुरेशी कारणे नमुद केली गेली आहेत. तसेच तक्रारदार / अर्जदारांनी केलेल्या मागणीनुसार सुसंगत असे प्रतिपादन प्रतिवादींनी त्याच्या पत्रात केले असल्याने सदर गाऱ्हाणे पुढे चालू ठेवण्याचे कारण उदभवत नाही, त्या अनुषंगाने सदर गाऱ्हाणे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे."*

६. ग्राहकाने अभिवेदनात मागितलेली माहिती ही २०११ पुर्वीची आहे. ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २००६ / २०२० मधील कलम २.३ नुसार 'गाऱ्हाणेच्या' व्याख्येत बसत नाही. गाऱ्हाणेची व्याख्या परिच्छेद क्रं.४ मध्ये दिली आहे. तसेच सदर गाऱ्हाणे कारवाईचे कारण उदभवलेल्या दिनांकापासून दोन वर्षात तक्रार मंचाकडे दाखल केले नाही. सबब, ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २००६ / २०२० मधील कलम ६.६ / ७.८ नुसार ते कालबाह्य ठरते व आहे. तसेच भविष्यात SRA मार्फत सदर झोपडपट्टीचे पुर्नविकास झाल्यास त्याचा फायदा अपिलार्थीस मिळण्याच्या दृष्टीने सुध्दा त्याना 'नोव्हेंबर १९८९ पुर्वीची' वीज जोडणी असल्याबाबत प्रतिवादी यानी पत्र दिल आहे. म्हणजे आता त्यांच्या तक्रारीत काही तथ्य राहीले नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

७.	विद्युत पुरवठा संहीता आणि कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनिमय २०२१ हे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ पासून लागू करण्यात आले. त्यामधील कलम १६.२.४.(अ) च्या तरतुदीनुसार वीज देयकामध्ये जोडणीचा दिनांक देणे हे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ पासून जे ग्राहक झालेत त्यांच्या साठी लागू आहे.

८.	अपिलार्थीच्या वीज जोडणीची मुळ तारीख मिळण्याची विनंती त्यांनी आपल्या अर्जात केली आहे. सदर मागणी 'गाऱ्हाणेच्या' व्याख्यत बसत नाही. शासकीय तक्रार निवारण यंत्रणेचा बहुमुल्य वेळ विनाकारण वाया घालविला याबाबत हे न्यायालय खेद व्यक्त करीत आहे, व अपिलार्थीचे अभिवेदन रू.४000/- च्या कॉस्टसह निकाली काढण्यात येत आहे. अपिलार्थींना आदेशीत करण्यात येत आहे की, आकारण्यात आलेली रू.४000/- रक्कम विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयात हा आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत जमा करावी.

९.	वरील सर्व बाबींचा एकत्रित उहापोह करता, मंचाचा आदेश कायम ठेवण्यात येत असून, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.